MHAM060028212023

**निशाणी क्र. १ वरील आदेश**

(०५.१०.२०२३ रोजी पारीत)

प्रस्तुत अर्ज कलम १३ (३) मृत्यू आणि मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये अर्जदाराने त्यांची आजी **भुरीबी मेहमुद खान** यांच्या मृत्यूची नोंद घेण्याबाबत आदेश मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. अर्जास कुणाचा आक्षेप आहे काय, हे तपासून पाहण्याकरीता दैनिक 'वृत्तकेसरी' मध्ये दस्तऐवज यादी **(नि.क्र.७)** प्रमाणे जाहीरनामा दि. २९.०८.२०२३ रोजी प्रकाशित करण्यात आला तसेच **(नि.क्र.५)** प्रमाणे प्रबंधक, नगरपरिषद, अचलपुर, ता. अचलपुर यांना नोटीस बजावणेत आली. गैरअर्जदार प्रबंधक, नगरपरिषद, अचलपुर, ता. अचलपुर यांनी हजर राहून आपले म्हणणे दाखल न केल्याने नि.१ वर त्यांचेविरुद्ध एकतर्फा आदेश करणेत आलेला आहे.

३. अर्जास कुणीही आक्षेप न नोंदविल्यामुळे, अर्जदार हबीब खान शाहबाज खान **(सा.क्र.१)** यांचा साक्षीपूरावा **(नि.क्र.८)** प्रमाणे नोंदविण्यात आला. त्यांच्या

पुराव्याप्रमाणे, त्यांचे आजी नामे **भुरीबी मेहमुद खान** यांचा मृत्यू दि. **०६.०८.१९७३** रोजी अचलपुर, ता. अचलपुर, जि. अमरावती येथे झाला आहे. तसेच सै. रऊफ सै. उस्मान **(सा.क्र.२)** व नासिर खान मजीद खान **(सा.क्र.३)** यांचा पुरावा अनुक्रमे **(नि.क्र.०९ व १०)** प्रमाणे नोंदविण्यात आले. त्यांच्या साक्षेत त्यांनी अर्जदाराच्या आजीचा मृत्यू दि. **०६.०८.१९७३** रोजी अचलपुर, ता. अचलपुर, जि. अमरावती येथे झाल्याबाबत पुष्टीदायक पुरावा दिलेला आहे. अर्जदाराने साक्षीपूराव्यास पुष्टी मिळविण्याकरिता, अर्जदाराने दस्तऐवज यादी **(नि.क्र.३/१)** प्रमाणे, अर्जदाराच्या आजीच्या मृत्यूची नोंद प्रबंधक, नगरपरिषद, अचलपुर, ता. अचलपुर कार्यालयामध्ये नसल्याबाबत अनुउपलब्धता प्रमाणपत्राची मूळ प्रत दाखल केली आहे व अर्जदाराच्या आधार कार्डची छायांकित प्रत दाखल केली आहे. अर्जदाराला त्यांच्या आजीचे नावे असलेल्या मिळकतीचे फेरफार करण्यासाठी पाहिजे असल्याचे त्यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्र नि.क्र.०८ मध्ये नमुद केले आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या आजीच्या मृत्यूच्या प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

४. अर्जदाराने त्याच्या आजीचा मृत्यू अचलपुर, ता. अचलपुर, जि. अमरावती येथे झाल्याबाबतचा तोंडी व लेखी साक्षीपुरावा दिला आहे. तसेच अर्जास कुणीही आक्षेप

घेतलेला नाही. अर्जदार व इतर साक्षीदाराच्या वतीने देण्यात आलेले साक्षीपूरावे, अर्जदाराच्या आजीच्या मृत्यूची नोंद घेण्याकरिता पुरेसा असल्यामुळे पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. **भुरीबी मेहमुद खान** यांचा मृत्यू **०६.०८.१९७३** रोजी अचलपुर, ता. अचलपुर, जि. अमरावती येथे झाल्याबाबत विहित फी भरल्यानंतर मृत्यू नोंदणी अभिलेखाला नोंद घ्यावी.

३. आदेशाची प्रत निबंधक/सचिव, (जन्म व मृत्यु विभाग) नगरपरिषद, अचलपुर, ता.अचलपुर, जि. अमरावती यांना पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात यावी.

**दि. ०५.१०.२०२३**

**(श्रीमती एस. एस. मांजरेकर)**
**न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**न्यायालय क्र.२ अचलपुर.**